**देवगड महाविद्यालयात सिंधुदुर्ग जिल्हा उद्योग केंद्र आणि युनियन बँक ऑफ इंडिया आयोजित 'मी उद्योजक बनणार ! 'या शासकीय योजना आणि बँक कर्ज प्रस्ताव याबद्दल मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन**

---

नवनवीन निर्माण होणाऱ्या व्यावसायिक संधींचा फायदा करून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी केवळ आर्थिक अडचणीमुळे मागे न राहता, विविध शासकीय योजनांचा वापर करून पुढे गेले पाहिजे. आजचा काळ हा केवळ नोकरी करणाऱ्यांचा नाही तर नोकरी देणाऱ्यांचा आहे. आपल्याला लाभलेली नैसर्गिक साधनसंपत्ती, बुद्धिमत्ता आणि कौशल्य यांचा योग्य समन्वय साधून आपल्या लोकांना सोबत घेऊन पुढे प्रगती केली पाहिजे. यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या शासकीय योजना आणि बँक कर्ज प्रस्ताव यांची माहिती देण्यासाठी देवगड महाविद्यालयातील EDC आणि placement cell यांनी विद्यार्थ्यांसाठी एका मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार, दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय सभागृहात केले होते. या कार्यक्रमास सिधुदुर्ग जिल्हा उद्योग केंद्र यांच्यावतीने श्री. श्रीपाद दामले ( महाव्यवस्थापक ), श्री. दामु पाडवे ( अधिक्षक ), श्री. पंकज शेळके ( निरीक्षक ), तसेच युनियन बँक देवगड यांच्यावतीने श्री. सिद्धांत गांगुली ( शाखाधिकारी ), तसेच शिक्षण विकास मंडळ, देवगडचे श्री. चंद्रहास मर्गज, श्री. एकनाथ तेली, श्री. वैभव बिडये आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुखदा जांबळे यांची उपस्थिती होती.

श्री. दामले यांनी बोलताना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम म्हणजेच CMEGP बद्दल माहिती दिली. उद्योजकतेस प्रोत्साहन देणारा हा कार्यक्रम व्यापक रोजगार निर्मितीला चालना देणारा राज्य शासनाचा महत्त्वकांक्षी कार्यक्रम असून यामध्ये पन्नास लाखापर्यंतचे प्रकल्प योजनेअंतर्गत पात्र असतात. सेवा, उद्योग, कृषी, पूरक तसेच उत्पादन

प्रकारचे उद्योग व्यवसायास पात्र आहेत. राज्य शासनाचे मार्जिन मिनी अनुदान 15% ते 35 टक्के असून महिलांसाठी 30 टक्के उद्दिष्ट राखीव आहे. यासाठी वयोमर्यादा 18 ते 45 वर्षे विशेष प्रवर्गासाठी पाच वर्षे यामध्ये शिथिलता देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक असलेल्या संकेतस्थळाचा वापर कसा करायचा याबद्दलची माहिती त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. श्री. शेळके यांनी, उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सूक्ष्म लघु उद्योग घटकांसाठी इतर महत्त्वपूर्ण योजना व उपक्रम सांगितले यामध्ये, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, सुधारित बीज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना, उत्कृष्ट लघु उद्योगासाठी जिल्हा पुरस्कार योजना, महाराष्ट्र राज्य सूक्ष्म लघु उपक्रम समूह विकास योजना, केंद्र शासनाची सूक्ष्म लघु उपक्रम समूह विकास योजना, महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती जमाती उद्योजक्ता प्रोत्साहन योजना, अशा प्रकारच्या विविध 13 योजनांचा समावेश यामध्ये आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना, सी एम इ जी पी या योजनेचा उद्देश, पात्रता, अटी, प्रकल्प मर्यादा, किंमत, पात्र, मालकी घटक इत्यादी सर्व माहिती याप्रसंगी देण्यात आली.

शासकीय योजनेत बँकेच्या सहभागाबद्दल सांगताना श्री. सिद्धांत गांगुली यांनी बँकेसमोर कर्जाचा प्रस्ताव ठेवताना कोणती काळजी घ्यावी, त्याचे नियम स्पष्ट केले. व्यवसाय सुरू करणारा कर्जदार आणि बँक दोघांच्याही सोयीसाठी प्रस्तुत कर्ज प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात सादर करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. जांबळे मॅडम यांनी, ' विद्यार्थ्यांनी काळाची पावले ओळखून विद्यार्थ्यांनी संधीचा फायदा करून घेतला पाहिजे. आपल्या कोकणात निसर्गाने भरभरून दान दिले आहे. तेव्हा पर्यावरणाला धक्का न लावता, आपला व्यवसाय सुरू करून आपल्यासोबत इतरांनाही पुढे घेऊन जाणे हे महत्वाचे आहे. त्या दृष्टीने सर्वांचे प्रयत्न असले पाहिजेत.' असे मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. टी. व्हि.घारे यांनी तर प्रा.एस. एस. खरात यांनी आभार प्रदर्शन केले.



DEVGAD
POCO X4 PRO 5G | CLICK BY AST
18/04/2023 13:07


DEVGAD
COLLEGE
POCO X4 PRO 5G | CLICK BY AST
18/04/2023 11:51